## जनसंपर्क विभाग

जळगाव (दि.०५) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठासह महाराष्ट्रातील ९ विद्यापीठांच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातर्फे मराठी पत्रकार दिनाचे औचित्य साधून दि.६ रोजी सकाळी ११ वाजता "कृत्रिम बुध्दिमत्ता (एआय) आणि माध्यमे" या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, डॉ बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर, मुंबई विद्यापीठ, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, श्रीमती दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा.डॉ. सदानंद मोरे तर प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार डॉ.धनंजय बिजले, प्रा.डॉ. योगेश बोराटे मार्गदर्शन करणार आहेत.

सहभागी होण्याचे आवाहन कला व मानवविद्या प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. रामचंद्र भावसार, प्रा. निशा मुडे-पवार, प्रा. संजय तांबट, प्रा. सुहास पाठक, प्रा. प्रभाकर कोळेकर, प्रा.प्रबास साहू, प्रा. सुंदर राजदिप, प्रा. मीरा देसाई, प्रा. माधवी रेड्डी, प्रा. सरफराज अन्सारी यांनी केले आहे. ऑनलाईन सहभागासाठी https://us06web.zoom.us/j/83240872194?pwd=cmf1sAKETcB9Imv2MXgl5auuTYKWaL.1 या लिंकवर जॉइन व्हावे. अधिक माहितीसाठी डॉ. गोपी सोरडे ९८३४१६६०७२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव (दि.०५) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील रसायन तंत्रज्ञान संस्था यांच्या वतीने दिनांक ६ व ७ जानेवारी २०२६ रोजी “Advances in Chemical Technology and Allied Sciences” या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. रसायन अभियांत्रिकी व संलग्न विज्ञान क्षेत्रातील नव्या संशोधन प्रवाहांवर चर्चा व ज्ञानविनिमय हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन उद्या मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या अधिसभागृहात होणार आहे. उद्घाटनप्रसंगी पद्मश्री प्रा. डॉ. जी. डी. यादव हे प्रमुख पाहुणे, प्रा. डॉ. आर. डी. कुलकर्णी, कुलगुरू – मुंबई विद्यापीठ हे विशेष अतिथी तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी उपस्थित राहणार आहेत.

सदर परिषदेसाठी ३०० विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक उपस्थित राहणार असल्याची माहिती परिषद समन्वयक डॉ. राजकुमार शिरसाम व युआयसीटीचे संचालक डॉ. ए. के. गोस्वामी यांनी दिली आहे.

**बातमी नं. ३**

जळगाव (दि.०५) प्रतिनिधी - राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक उत्कर्ष स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा १९ सदस्यीय संघ सोलापूरकडे दि. ०२ रोजी रवाना झाला आहे.

राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक उत्कर्ष स्पर्धेचे दि. ०४ ते ०७ जानेवारी २०२६ या कालावधीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यापीठाचा १९ जणांचा संघ यात ९ मुले, ९ मुली व १ कार्यक्रम अधिकारी असा संघ सोलापूरकडे रवाना झाला.

संघ रवाना होण्यापूर्वी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र. कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद प्रभाकर पाटील रासयोचे संचालक प्रा. व्ही. एम. रोकडे यांनी संघास शुभेच्छा दिल्या. यावेळी प्र-कुलगुरू मा. प्रा. एस. टी. इंगळे यांनी रासेयो स्वयंसेवकांची कर्तव्ये, शिस्त, सामाजिक बांधिलकी व विद्यापीठाची प्रतिमा जपण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक उत्कर्ष स्पर्धेत विद्यापीठाचा संघ उत्कृष्ट कामगिरी करून यश संपादन करेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

या प्रसंगी जिल्हा रासेयो समन्वयक डॉ. दिनेश प्रकाश पाटील, डॉ. राजू सुरेश गयरे, डॉ. दीपक निवृत्ती बावस्कर, डॉ. योगेश आनंदा माळी, शरद पंडितराय पाटील कैलास औटी, विलास पाटील, सौरभ साचले, विजय चिन्हाडे आदी उपस्थित होते.

सहभागी विद्यार्थ्यांची यादी - संकेत पाटील (श्री. जी. जी. खडसे कला व विज्ञान महाविद्यालय, मुक्ताईनगर), विशाल बैरागी (एस. एस. व्हि. एस. चे कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे), राहुल सपकाळे (मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव), कमलेश चव्हाण (जी. टी. पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार) कमलेश सोनवणे (एस. एस. मणियार विधी महाविद्यालय, जळगाव) आकाश चौरे (सामाजिकशास्त्रे प्रशाळा (समाजकार्य विभाग), कबचौ उमवि, जळगाव), युवराज विसपुते (झुलाल भिलाजीरथ पाटील महाविद्यालय, धुळे) प्रणय पाटील (झुलाल भिलाजीरथ पाटील महाविद्यालय, धुळे), चेतन कोळी (झुलाल भिलाजीरथ पाटील महाविद्यालय, धुळे), जागृती बारी (जे. डी. एम. व्ही. पी. एस. चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव), उन्नती भगरे (बाबासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा, जि. जळगाव), ओंकार जाधव (एस. टी. को-ऑप. सोसायटीचे वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय, शहादा, जि. नंदुरबार) पायल राजपूत (एस.

टी. को-ऑप. सोसायटीचे वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय, शहादा, जि. नंदुरबार), मानसी मंडलिक (स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे) जान्हवी वळवी ( व्हि. पी. एम. एस. चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा, जि. नंदुरबार), नेहल चौधरी (श्री. स्वरूपसिंग हिल्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर, जि. नंदुरबार),जागृती पाटील (जी. टी. पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार) कोमल शिरसाठ ( एस. एस. मणिधार विधी महाविद्यालय, जळगाव) डॉ. दीपक बावस्कर (सामाजिकशास्त्रे प्रशाळा (समाजकार्य विभाग), कबचौ उमवि, जळगाव), संघ व्यवस्थापक ; जी. जी. खडसे (कला व विज्ञान महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि. जळगाव)

**बातमी नं. ४**

जळगाव (दि.०५) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या वतीने दि ०३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी बोलताना व्यवस्थापन परिषद सदस्या प्रा. डॉ पवित्रा पाटील म्हणाल्या की, आधुनिक काळात महिला आणि मुली या विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत आहेत त्याचे सर्व श्रेय सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांना जाते. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजातील भेदभाव, उच्च-नीचता, कर्मकांड याविरुद्ध बंड पुकारून सर्वच समाजातील स्त्रियांना शिक्षणाचे द्वारे खुले केले. म्हणून मुला मुलींनी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन उच्च शिक्षणात उत्तुंग भरारी घ्यावी. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांचे जात धर्म विहीन समाज व्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न आजच्या युवक युवतींनी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. उमेश गोगडिया यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ आंबेडकर विचारधारा विभागाचे डॉ. विजय घोरपडे तर प्रा. योगेश माळी यांनी आभार मानले. यावेळी सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील प्राध्यापक शिक्षकेतर, कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ५ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता